**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठात शैक्षणिक अंकेक्षणावर कार्यशाळा संपन्न

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये संलग्नित महाविद्यालयांना निरंतर संलग्निकरण देण्यासंदर्भात करावयाचे शैक्षणिक अंकेक्षणावर नुकतीच कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव श्री डी.एस. राऊत, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, ह.व्या.प्र.मं.चे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे, उपकुलसचिव सौ. सुलभा पाटील उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, दिवसेंदिवस शिक्षणपद्धतीत बदल होत आहे. शिक्षण क्षेत्रात होणारे बदल आपण स्वीकारले पाहिजे; तरच आपण समाजाचा विकास करु शकू. शिक्षण क्षेत्रातील बदललेल्या संकल्पनांना सामोरे जातांना शैक्षणिक अंकेक्षण महत्वाचे झाले आहे. नवीन विद्यापीठ कायद्यात तशा प्रकारची तरतुद आहे. शैक्षणिक संस्थांनी समाजाभिमुख होणे गरजेचे आहे, त्यादृष्टीने विद्यापीठाने ट्रायबल डेव्हलपमेंट सेंटर, उन्नत भारत अभियान, स्टार्टअप, दत्तक ग्राम योजना, स्वयंसिद्धता, बांबू केंद्र, रोजगारक्षम अभ्यासक्रम, ट्रेन द ट्रेनर्स, व्हर्च्युअल सी-फोरच्या माध्यमातून तज्ज्ञांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांसाठी विविध योजना, आपत्ती व्यवस्थापन अशा अनेक योजना सुरु केल्या आहेत. शिक्षण क्षेत्रात काम करीत असतांना आपल्याला समाजाशी नाते जोडावेच लागणार आहे, त्यादृष्टीने शैक्षणिक अंकेक्षण महत्वाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शैक्षणिक अंकेक्षणासंदर्भात माहिती देतांना प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे म्हणाले, महाविद्यालयांचे निरंतर संलग्निकरण हे आता शैक्षणिक अंकेक्षणा नंतरच दिले जाणार आहे. शैक्षणिक अंकेक्षण कुणी करायचे, कां करायचे, किती कालावधीत करायचे, ते कोण करेल, यासंदर्भातील सविस्तर माहिती आणि याशिवाय शैक्षणिक अंकेक्षणामध्ये समाविष्ट बाबींवर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. निरंतर संलग्निकरण मिळविण्यासाठी असलेली प्रक्रिया, तसेच शैक्षणिक अंकेक्षणामधील संपूर्ण प्रपत्र व त्यात नमूद बाबींची त्यांनी माहिती दिली. याप्रसंगी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांचे समाधान प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर व प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे यांनी करुन दिले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनीसुद्धा आपले मत व्यक्त केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी परीक्षापद्धत व मूल्यांकनाबाबत माहिती दिली. संचालन महाविद्यालयीन विभागाच्या उपकुलसचिव सौ. सुलभा पाटील यांनी, तर आभार सहा. कुलसचिव डॉ. रामसिंह येवतीकर यांनी मानले. कार्यशाळेला संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे विभागप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १०/०५/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:Users/PRO/Desktop/University News 2019 152